North Asian International Research Journal of Social Science & Humanities

ISSN: 2454-9827 Vol. 12, Issue-1 January-2026

IRJIF I.F. : 3.015

Index Copernicus Value: 57.07 Indian Citation Index Thomson Reuters ID: S-8304-2016

NAIRJC UGC-Aligned | HEI-Approved Peer Reviewed Refereed Journal (Under New UGC Guidelines)

# ग्राम विकास आराखडा अंमलबजावणीचा ग्राम विकासावरील परिणामाचा अभ्यास : विशेष संदर्भ वाशिम जिल्हा

प्रा. उध्दव शिवाजी जमधाडे [1], डॉ. संजय साळीवकर [2]

[1] सहा. प्राध्यापक, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम,

[2] प्राचार्य श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

**सारांश :**

*ग्रामीण विकास हा कोणत्याही देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आधारस्तंभ आहे. भारतात ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे गावस्तरावर संतुलित आणि शाश्वत विकास साधणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर ग्राम विकास आराखडा ही स्थानिक गरजांनुसार आणि लोकसहभागातून विकासाचे नियोजन करण्याची महत्त्वाची साधने ठरते. वाशिम जिल्हा, जो प्रामुख्याने कृषीप्रधान आणि मागास ग्रामीण भागांचा समावेश करतो, येथे ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा ग्राम विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास या संशोधनाचा उद्देश आहे.*

*सदर संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धती अवलंबण्यात आली असून, प्राथमिक माहिती ७० उत्तरदात्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून गोळा केली गेली. आराखड्याची अंमलबजावणी, ग्रामस्थांचा सहभाग, पायाभूत सुविधा, सामाजिक व आर्थिक बदल तसेच अडचणी यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यात आला. अभ्यासातून असे दिसून आले की ५५% उत्तरदात्यांच्या मते आराखडा तयार केला जातो, तर ७१.४३% लोकांनी त्याची ग्रामसभेत मंजुरी होणे सांगितले. ६४.२९% लोकांच्या मते आराखड्यात नमूद कामे प्रत्यक्षात राबवली जातात, मात्र काही कामांमध्ये विलंब किंवा अपूर्णता आढळली.*

*आराखड्यामुळे पायाभूत सुविधा रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, रोजगार संधी, सामाजिक सहभाग आणि आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये सुधारणा झाली आहे; मात्र, बहुतेक उत्तरदात्यांनी "काही प्रमाणात सुधारणा" असे सांगितले, जे सुधारणा अजून संपूर्णपणे सर्वांना पोहोचलेली नाही, हे सूचित करते. अंमलबजावणीतील मुख्य अडचणी म्हणजे निधीची मर्यादा ४२.८६%, ग्रामस्थांचा सहभाग कमी असणे ३५.७१%, प्रशासनातील विलंब ३८.५७% आणि तांत्रिक साधनांची कमतरता २८.५७% आहेत.*

*सुधारात्मक उपायांमध्ये अधिक लोकसहभाग सुनिश्चित करणे ५४.२९%, निधी व संसाधनांचा प्रभावी वापर ५७.१४%, प्रशासन सुधारणा ५०%, प्रशिक्षण व तांत्रिक मदत ४५.७१% आणि नियमित निरीक्षण व पारदर्शकता ५७.१४% यांचा समावेश आहे.*

*अभ्यासातून स्पष्ट होते की ग्राम विकास आराखडा ग्रामीण विकासावर सकारात्मक प्रभाव टाकतो; तरीही त्याची प्रभावी अंमलबजावणी आर्थिक, प्रशासनिक आणि सहभागात्मक मर्यादांमुळे पूर्ण होत नाही. या निष्कर्षांवर आधारित, भविष्यातील धोरणे अधिक परिणामकारक व सर्वसमावेशक बनविणे गरजेचे आहे.*

## प्रस्तावना :

ग्रामीण विकास हा कोणत्याही देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा कणा मानला जातो. भारतातील एकूण लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास असल्याने ग्रामीण भागाचा संतुलित व शाश्वत विकास साधणे अत्यंत आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर ग्रामपातळीवर नियोजनबद्ध विकासासाठी ग्राम विकास आराखडा (Gram Development Plan) ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. ग्राम विकास आराखडा हा स्थानिक गरजांनुसार, लोकसहभागातून तयार करण्यात येणारा विकासाचा दस्तऐवज असून तो ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण विकासासाठी दिशादर्शक ठरतो.

महाराष्ट्र शासनाने विकेंद्रित नियोजनाच्या धोरणाअंतर्गत ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या आराखड्याद्वारे पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, रोजगारनिर्मिती, महिला व बालकल्याण तसेच सामाजिक व आर्थिक विकासाशी संबंधित विविध बाबींचा समावेश केला जातो. मात्र आराखडा तयार करणे आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे या दोन भिन्न प्रक्रिया असून अंमलबजावणीची प्रभावीता ग्राम विकासाच्या गुणवत्तेवर थेट परिणाम करते.

वाशिम जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान व मागास ग्रामीण भागांचा समावेश असलेला जिल्हा असून येथे ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमुळे ग्रामस्तरावर कोणत्या स्वरूपाचे बदल घडून आले आहेत, हे अभ्यासणे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. आराखड्याच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण पायाभूत सुविधा, जीवनमान, लोकसहभाग, प्रशासनातील पारदर्शकता व शाश्वत विकास या बाबींमध्ये झालेल्या बदलांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे आवश्यक आहे.

सदर संशोधनाचा उद्देश वाशिम जिल्ह्यातील ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा ग्राम विकासावर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. या अभ्यासातून ग्राम विकास आराखड्याची प्रभावीता, अंमलबजावणीतील अडचणी तसेच भविष्यातील सुधारणा सुचविण्यासाठी उपयुक्त निष्कर्ष मिळण्याची अपेक्षा आहे.

## संशोधनाची गरज व महत्व

ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध योजना आणि कार्यक्रम राबविले आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्राम विकास आराखडा ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची

ठरते. ग्रामसभेच्या माध्यमातून स्थानिक गरजा ओळखून, त्या गरजांनुसार विकासात्मक नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे ग्राम विकास आराखड्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मात्र, आराखडा तयार होणे आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे यामध्ये अनेक वेळा तफावत आढळून येते.

वाशिम जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान आणि ग्रामीण स्वरूपाचा जिल्हा असून, येथे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, रोजगार व सामाजिक विकासाशी संबंधित विविध समस्या आजही दिसून येतात. ग्राम विकास आराखड्याच्या माध्यमातून या समस्यांवर कितपत प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत, तसेच आराखड्याची अंमलबजावणी ग्राम विकासावर प्रत्यक्षात किती आणि कसा परिणाम घडवून आणते, याचा सखोल अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

आजपर्यंत ग्राम विकास आराखड्याच्या संकल्पनेवर काही अभ्यास झालेले असले, तरी आराखड्याच्या अंमलबजावणीचा ग्राम विकासावर होणाऱ्या प्रत्यक्ष परिणामांचा विशेषतः वाशिम जिल्ह्याच्या संदर्भात सविस्तर व अनुभवाधारित अभ्यास तुलनेने मर्यादित प्रमाणात झालेला दिसून येतो. त्यामुळे सदर संशोधनाच्या माध्यमातून ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी कितपत यशस्वी ठरत आहे, कोणत्या अडचणी येत आहेत, स्थानिक लोकसहभागाची भूमिका काय आहे आणि आराखड्यामुळे गावांच्या सामाजिक–आर्थिक विकासात कोणते सकारात्मक किंवा नकारात्मक बदल घडून येत आहेत, याचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

या अभ्यासातून प्राप्त होणारे निष्कर्ष हे ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक प्रशासन, धोरणकर्ते तसेच संशोधक यांना ग्राम विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक ठरतील. तसेच भविष्यातील ग्राम विकास धोरणे अधिक परिणामकारक बनविण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरेल, हेच या संशोधनाचे प्रमुख औचित्य आहे.

## संशोधनाची उदिदष्टे :

1) वाशिम जिल्ह्यात ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी कशी होत आहे याचा अभ्यास करणे.
2) ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा ग्राम विकासाच्या विविध घटकांवर (पायाभूत सुविधा, सामाजिक व आर्थिक विकास) होणारा परिणाम विश्लेषित करणे.
3) ग्राम विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसमोरील अडचणी व आव्हाने शोधून त्यावर सुधारात्मक उपाय सुचवणे.

## संशोधन पध्दती

या संशोधनात *“ग्राम विकास आराखडा अंमलबजावणीचा ग्राम विकासावरील परिणामांचा अभ्यास विशेष : जिल्हा वाशिम संदर्भ”* या विषयाचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे संशोधनासाठी सदर .वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमुळे गावाच्या सामाजिक, आर्थिक व पायाभूत विकासावर होणाऱ्या परिणामांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहेवापर पद्धतीचा संकलन माहिती प्राथमिक संशोधनासाठी . करण्यात आला असून, माहिती थेट

उत्तरदात्यांकडून गोळा करण्यात आली आहे ग्रामपंचायतींमधील निवडक जिल्ह्यातील वाशिम अभ्यासासाठी या . ) नमुना उत्तरदात्यांचा ७० एकूणSample Size = 70) घेण्यात आला आहे सुलभ निवडीसाठी नमुना . मा .आहे आला करण्यात वापर पद्धतीचा निवड नमुनाहिती संकलनासाठी संशोधकाने स्वतः तयार केलेले प्रश्नावली )Self-constructed Tool) हे मुख्य संशोधन साधन म्हणून वापरले असून, त्यामध्ये ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी, लोकसहभाग, उपलब्ध सुविधा, विकासात्मक बदल व अडचणी यासंबंधी प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आला असून, टक्केवारी व सरासरी यांसारख्या साध्या सांख्यिकीय तंत्रांचा वापर करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत वाशिम अंमलबजावणीमुळे प्रभावी आराखड्याच्या विकास ग्राम पद्धतीद्वारे संशोधन या . जिल्ह्यातील ग्राम विकासावर होणाऱ्या परिणामांचे स्पष्ट चित्र समोर येण्यास मदत झाली आहे.

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

**सारणी क्र .1.1 वाशिम जिल्ह्यात ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी कशी होत आहे याचे विवरण दर्शविणारी सारणी**

| | विवरण | होय | काही प्रमाणात | नाही |
|---|---|---|---|---|
| 1 | आपल्या गावात ग्राम विकास आराखडा तयार केला जातो का? | 55 | 12 | 3 |
| | | 78.57 | 17.14 | 4.29 |
| 2 | ग्राम विकास आराखडा ग्रामसभेत मंजूर केला जातो का? | 50 | 15 | 5 |
| | | 71.43 | 21.43 | 7.14 |
| 3 | ग्राम विकास आराखडा तयार करताना ग्रामस्थांचा सहभाग घेतला जातो का? | 40 | 20 | 10 |
| | | 57.14 | 28.57 | 14.29 |
| 4 | आराखड्यातील विकासकामे वेळेत पूर्ण होतात का? | 35 | 25 | 10 |
| | | 50.00 | 35.71 | 14.29 |
| 5 | आराखड्यात नमूद केलेली कामे प्रत्यक्षात राबवली जात आहेत का? | 45 | 20 | 5 |
| | | 64.29 | 28.57 | 7.14 |
| 6 | ग्रामपंचायत आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नियमित बैठक घेते का? | 48 | 18 | 4 |
| | | 68.57 | 25.71 | 5.71 |
| 7 | विकासकामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होतो का? | 30 | 25 | 15 |
| | | 42.86 | 35.71 | 21.43 |
| 8 | आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येतात का? | 10 | 30 | 30 |
| | | 14.29 | 42.86 | 42.86 |
| 9 | ग्राम विकास आराखड्यामुळे गावाच्या विकासात सुधारणा झाली आहे असे वाटते का? | 50 | 15 | 5 |
| | | 71.43 | 21.43 | 7.14 |
| 10 | ग्राम विकास आराखड्याची माहिती ग्रामस्थांना योग्य प्रकारे दिली जाते का? | 42 | 20 | 8 |
| | | 60.00 | 28.57 | 11.43 |

सारणी क्र. 1.1 मध्ये वाशिम जिल्ह्यातील ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीची माहिती देत आहे. यात १० प्रश्न विचारण्यात आले असून, त्यात "होय", "काही प्रमाणात", आणि "नाही" या पर्यायांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे मत गोळा केले आहे. या डेटावरून ग्राम विकास आराखड्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी, ग्रामस्थांचा सहभाग, अडचणी, निधीची उपलब्धता व विकासकामांची गुणवत्ता याबाबत सखोल माहिती मिळते. यामध्ये ५५% लोकांनी "होय" असे उत्तर दिले आहे, म्हणजे बहुसंख्य गावांमध्ये ग्राम विकास आराखडा तयार केला जातो. १७.१४% लोक म्हणाले की तो काही प्रमाणात तयार होतो, तर फक्त ४.२९% म्हणाले की आराखडा तयार होत नाही. यावरून स्पष्ट होते की गावांमध्ये आराखडा तयार होण्याची पद्धत बहुतेक ठिकाणी राबवली जात आहे, मात्र काही गावांमध्ये प्रक्रियेत त्रुटी किंवा अपूर्णता आढळते.

ग्रामसभेत आराखडा मंजूर होण्याबाबत ७१.४३% लोकांचा होय असा प्रतिसाद आहे. २१.४३% लोक म्हणाले की काही प्रमाणात मंजुरी दिली जाते आणि ७.१४% लोक म्हणाले की मंजुरी होत नाही.
यावरून स्पष्ट होते की, बहुसंख्य गावांमध्ये आराखडा ग्रामसभेत अनुमोदित केला जातो, ज्यामुळे पारदर्शकता आणि स्थानिक लोकांचा सहभाग सुनिश्चित होतो, पण काही ठिकाणी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक नसते.

आराखडा तयार करताना ग्रामस्थांचा सहभागाबाबत ५७.१४% लोकांनी होय असे उत्तर दिले, तर २८.५७% म्हणाले काही प्रमाणात सहभाग घेतला जातो. १४.२९% लोक म्हणाले की सहभाग होत नाही.
यामध्ये सहभागाचे प्रमाण मध्यम आहे. अनेक ठिकाणी ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग मर्यादित आहे, ज्यामुळे आराखड्याची गरज आणि प्राथमिकता योग्य प्रकारे प्रतिबिंबित होऊ शकत नाही.

यामध्ये ५०% लोकांच्या मते विकासकामे वेळेत पूर्ण होतात, ३५.७१% म्हणाले काही प्रमाणात वेळेत पूर्ण होतात आणि १४.२९% म्हणाले की वेळेत पूर्ण होत नाहीत. विकासकामांमध्ये काही प्रमाणात विलंब आढळतो. कार्यवाही आणि नियोजन यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

आराखड्याच्या कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये ६४.२९% लोक म्हणाले की आराखड्यात नमूद केलेली कामे प्रत्यक्षात राबवली जातात. २८.५७% म्हणाले काही प्रमाणात, तर ७.१४% म्हणाले की कामे राबवली जात नाहीत. यामध्ये बहुसंख्य कामे अंमलात आहेत, हे ग्राम विकास प्रक्रियेची सकारात्मक बाजू आहे. तथापि, काही कामांमध्ये अपूर्णता दिसून येते.

ग्रामपंचायतीच्या बैठकींची नियमितता यामध्ये ६८.५७% लोक म्हणाले की ग्रामपंचायत नियमित बैठक घेते, २५.७१% म्हणाले काही प्रमाणात, आणि ५.७१% म्हणाले की बैठक घेतली जात नाही. नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत ग्रामपंचायतीकडून सातत्य राखले जाते, ज्यामुळे आराखड्याची अंमलबजावणी सुधारते.

निधीची उपलब्धता यामध्ये ४२.८६% लोक म्हणाले की विकासकामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे. ३५.७१% म्हणाले काही प्रमाणात, आणि २१.४३% म्हणाले की निधी उपलब्ध नाही. निधीची मर्यादित उपलब्धता काही कामांमध्ये विलंब किंवा अपूर्ण अंमलबजावणीची कारणे ठरू शकते.

अंमलबजावणीत अडचणी याबाबत ४२.८६% लोक म्हणाले की अडचणी येतात, १४.२९% म्हणाले की अडचणी कमी आहेत आणि ४२.८६% म्हणाले की अडचणी नाहीत. अंमलबजावणीत अनेक अडचणी येतात, जसे की निधी, कामगार किंवा प्रशासनिक अडथळे. ही प्रमुख आव्हाने आहेत.

आराखड्यामुळे गावाच्या विकासात सुधारणाच्या बाबतीत ७१.४३% लोकांना वाटते की ग्राम विकास आराखड्यामुळे विकासात सुधारणा झाली आहे. २१.४३% म्हणाले काही प्रमाणात, आणि ७.१४% म्हणाले की सुधारणा नाही. आराखड्याची अंमलबजावणी गावाच्या विकासासाठी उपयुक्त आहे आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसतो.

माहिती पोहोचवण्याची योग्य पद्धतीच्या बाबतीत ६०% लोक म्हणाले की माहिती योग्य पद्धतीने दिली जाते, २८.५७% म्हणाले काही प्रमाणात, आणि ११.४३% म्हणाले की माहिती योग्यरित्या पोहोचत नाही. ग्रामस्थांना माहिती देण्यात काही प्रमाणात कमतरता आहे, जी आराखड्याची पारदर्शकता सुधारण्यास आवश्यक आहे.

तात्पर्य बहुसंख्य गावांमध्ये आराखडा तयार केला जातो, ग्रामसभेत मंजूर होतो, विकासकामांची अंमलबजावणी होते आणि विकासात सुधारणा दिसते. सुधारणा आवश्यक क्षेत्रे यामध्ये निधीची उपलब्धता, अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, ग्रामस्थांचा सहभाग, आणि माहिती पोहोचवण्याची पद्धत यावर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**सारणी क्र. 1.2 ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा ग्राम विकासाच्या विविध घटकांवर (पायाभूत सुविधा, सामाजिक व आर्थिक विकास) होणाऱ्या परिणामाचे विवरण दर्शविणारी सारणी**

| | विवरण | होय | काही प्रमाणात | नाही |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्राम विकास आराखड्यामुळे गावातील पायाभूत सुविधांमध्ये (रस्ते, पाणी, वीज) सुधारणा झाली आहे का? | 28 | 32 | 10 |
| | | 40.00 | 45.71 | 14.29 |
| 2 | आराखड्याच्या अंमलबजावणीमुळे शिक्षण व आरोग्य सुविधा वाढल्या आहेत का? | 25 | 35 | 10 |
| | | 35.71 | 50.00 | 14.29 |
| 3 | ग्राम विकास आराखड्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत का? | 20 | 40 | 10 |
| | | 28.57 | 57.14 | 14.29 |
| 4 | आर्थिक विकासाच्या दृष्टीने गावातील उत्पन्नात वाढ झाली आहे का? | 18 | 37 | 15 |
| | | 25.71 | 52.86 | 21.43 |
| 5 | आराखड्यामुळे सामाजिक एकोपा व सहभाग वाढला आहे का? | 30 | 30 | 10 |
| | | 42.86 | 42.86 | 14.29 |
| 6 | ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी समाधानकारक वाटते का | 22 | 38 | 10 |
| | | 31.43 | 54.29 | 14.29 |

वरील सारणीमध्ये पायाभूत सुविधांवर परिणामाच्या बाबतीत सर्वप्रथम, गावातील पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज) या घटकांवर ग्राम विकास आराखड्याचा परिणाम पाहता येतो. ४०% लोकांनी स्पष्टपणे मान्य केले की आराखड्यामुळे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे, तर ४५.७१% लोकांनी काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे सांगितले. केवळ १४.२९% लोकांनी सुधारणा झालेली नाही असे उत्तर दिले. गुणात्मकदृष्ट्या, हे सूचित करते की आराखड्याच्या अंमलबजावणीत पायाभूत सुविधा सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे, मात्र काही भागांत अजूनही सुधारणा आवश्यक आहे.

शिक्षण आणि आरोग्य सुविधांवर परिणामाच्या बाबतीत शिक्षण व आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे का, या प्रश्नावर ३५.७१% लोकांनी होय आणि ५०% लोकांनी काही प्रमाणात सुधारणा झाली असे उत्तर दिले. केवळ १४.२९% लोकांनी नकार दिला. आराखड्यामुळे गावातील लोकांसाठी शिक्षण आणि आरोग्य सुविधा सुधारण्यात सकारात्मक बदल दिसून येतात. मात्र, काही प्रमाणात सुधारणा दर्शविणारे मोठे प्रमाण हे दर्शवते की सुधारणा पूर्णपणे सर्वांसाठी पोहोचलेली नाही.

रोजगाराच्या संधींवर परिणाम यामध्ये आराखड्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या का, याबाबत २८.५७% लोकांनी होय, ५७.१४% लोकांनी काही प्रमाणात आणि १४.२९% लोकांनी नाही असे उत्तर दिले. आराखड्यामुळे रोजगाराच्या संधी निश्चितच निर्माण झाल्या आहेत, परंतु काही लोकांच्या दृष्टीने या संधी मर्यादित आहेत. त्यामुळे रोजगार वृद्धीचा प्रभाव मध्यम प्रमाणात असून, अजून पुढील प्रयत्नांची गरज आहे.

आर्थिक विकासावर परिणाम याबाबत गावातील उत्पन्न वाढीवर प्रश्न विचारल्यावर, २५.७१% लोकांनी होय, ५२.८६% लोकांनी काही प्रमाणात आणि २१.४३% लोकांनी नाही असे उत्तर दिले. यावरून आर्थिक विकासाचा प्रभाव ग्रामीण भागात मध्यम आहे. उत्पन्न वाढ झाली असली तरी ती सर्वांसाठी समान प्रमाणात पोहोचलेली नाही.

सामाजिक एकोपा व सहभागावर परिणाम याबाबत सामाजिक एकोपा व सहभाग वाढला आहे का, या प्रश्नावर ४२.८६% लोकांनी होय आणि ४२.८६% लोकांनी काही प्रमाणात उत्तर दिले. फक्त १४.२९% लोकांनी नकार दिला, ग्राम विकास आराखड्यामुळे सामाजिक सहभाग वाढला असून, लोकांच्या सहभागात सुधारणा दिसून येते. ही परिणामकारकता आराखड्याच्या सामाजिक दृष्टीने महत्त्व दर्शवते.

अंमलबजावणीचा समाधानकारक अनुभव याबाबत आराखड्याची अंमलबजावणी समाधानकारक वाटते का, या प्रश्नावर ३१.४३% लोकांनी होय, ५४.२९% लोकांनी काही प्रमाणात आणि १४.२९% लोकांनी नाही असे उत्तर दिले, बहुतेक लोक आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत समाधानी आहेत, तरीही काही लोकांना अजून सुधारणा अपेक्षित आहे. याचा अर्थ, आराखड्याची अंमलबजावणी मूलतः योग्य असून, काही स्थानिक सुधारणा आवश्यक आहेत.

सारांशतः, ग्राम विकास आराखडा गावातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, आर्थिक विकास आणि सामाजिक सहभाग या सर्व क्षेत्रांमध्ये सकारात्मक प्रभाव दाखवतो. परंतु, प्रत्येक घटकात “काही

प्रमाणात सुधारणा" अशी उत्तरांची मोठी संख्या दर्शवते की, सुधारणा अजूनही संपूर्णपणे सर्वांना पोहोचलेली नाही. त्यामुळे आराखड्याची प्रभावकारिता सकारात्मक आहे, पण सुधारणा आणखी सुसंगत आणि सर्वसमावेशक करण्याची गरज आहे.

**सारणी क्र. 1.3 ग्राम विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसमोरील अडचणी व आव्हाने शोधून त्यावर सुधारात्मक उपायांचे विवरण दर्शविणारी सारणी**

| | विवरण | होय | काही प्रमाणात | नाही |
|---|---|---|---|---|
| 1 | तुमच्या गावात ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी प्रभावी आहे | *18* | *35* | *17* |
| | | 25.71 | 50.00 | 24.29 |
| 2 | ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी: निधीची कमतरता | *30* | *28* | *12* |
| | | 42.86 | 40.00 | 17.14 |
| 3 | ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी: लोकांची सहभागाची कमतरता | *25* | *32* | *13* |
| | | 35.71 | 45.71 | 18.57 |
| 4 | ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी: प्रशासनातील विलंब / क्लिष्ट प्रक्रिया | *27* | *30* | *13* |
| | | 38.57 | 42.86 | 18.57 |
| 5 | ग्राम विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी: तांत्रिक साधनांची कमतरता | *20* | *33* | *17* |
| | | 28.57 | 47.14 | 24.29 |
| 6 | गावात सुधारणा करण्यासाठी उपाय: अधिक लोक सहभाग सुनिश्चित करणे | *38* | *25* | *7* |
| | | 54.29 | 35.71 | 10.00 |
| 7 | गावात सुधारणा करण्यासाठी उपाय: निधी व संसाधनांचा प्रभावी वापर | *40* | *22* | *8* |
| | | 57.14 | 31.43 | 11.43 |
| 8 | गावात सुधारणा करण्यासाठी उपाय: प्रशासन सुधारणा / जलद प्रक्रिया | *35* | *28* | *7* |
| | | 50.00 | 40.00 | 10.00 |
| 9 | गावात सुधारणा करण्यासाठी उपाय: प्रशिक्षण व तांत्रिक मदत | *32* | *30* | *8* |
| | | 45.71 | 42.86 | 11.43 |
| 10 | ग्राम विकास प्रकल्पांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रभावी मार्ग: बैठक / सर्वेक्षण | *28* | *32* | *10* |
| | | 40.00 | 45.71 | 14.29 |
| 11 | ग्राम विकास प्रकल्पांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रभावी मार्ग: स्थानिक समित्या / स्वयंसेवी गट | *30* | *33* | *7* |
| | | 42.86 | 47.14 | 10.00 |
| 12 | ग्राम विकास प्रकल्पांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग | *25* | *35* | *10* |
| | | 35.71 | 50.00 | 14.29 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वाढवण्यासाठी प्रभावी मार्ग: जनजागृती मोहीम | | | |
| 13 | ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे: कार्यक्षम नियोजन | *42*<br>60.00 | *22*<br>31.43 | *6*<br>8.57 |
| 14 | ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे: पारदर्शक निधी व्यवस्थापन | *45*<br>64.29 | *20*<br>28.57 | *5*<br>7.14 |
| 15 | ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे: नियमित निरीक्षण व अहवाल | *40*<br>57.14 | *25*<br>35.71 | *5*<br>7.14 |
| 16 | ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे: प्रशिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर | *38*<br>54.29 | *28*<br>40.00 | *4*<br>5.71 |

सारणी क्र. 1.3 मधील डेटा ग्राम विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसमोरील अडचणी व सुधारात्मक उपाय यांचे सविस्तर चित्र उभे करतो. सर्वप्रथम, प्रभावी अंमलबजावणीबाबत विचारले असता, उत्तरदात्यांपैकी फक्त २५.७१% ने “होय” असे उत्तर दिले, तर ५०% ने “काही प्रमाणात” असे उत्तर दिले, यावरून हे लक्षात येते की ग्राम विकास आराखडा पूर्णतः प्रभावी असल्याचे प्रमाण मर्यादित आहे आणि अनेक ठिकाणी सुधारणा आवश्यक आहे. अडचणींबाबत, निधीची कमतरता ४२.८६% आणि लोकांची सहभागाची कमतरता ३५.७१% ही प्रमुख अडचणी आहेत, तर प्रशासनातील विलंब आणि क्लिष्ट प्रक्रिया ३८.५७% व तांत्रिक साधनांची कमतरता २८.५७% या देखील महत्त्वाच्या समस्या आहेत, ज्यामुळे आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी अडथळ्यात येते.

सुधारात्मक उपायांबाबत, अधिक लोक सहभाग सुनिश्चित करणे ५४.२९% आणि निधी व संसाधनांचा प्रभावी वापर ५७.१४% हे प्रमुख उपाय म्हणून दिसतात. प्रशासन सुधारणा व जलद प्रक्रिया ५०% तसेच प्रशिक्षण व तांत्रिक मदत ४५.७१% यालाही महत्त्व दिले गेले आहे. स्थानिक लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी बैठक, सर्वेक्षण, स्थानिक समित्या व स्वयंसेवी गट यांचा वापर प्रभावी मानला गेला आहे, ज्यामध्ये जनजागृती मोहिमाही ३५.७१% उपयुक्त ठरू शकते. प्रशासनाने लक्ष द्यावे अशा बाबींपैकी कार्यक्षम नियोजन ६०%, पारदर्शक निधी व्यवस्थापन ६४.२९%, नियमित निरीक्षण व अहवाल ५७.१४% व प्रशिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर ५४.२९% या उपायांची उच्च गरज असल्याचे स्पष्ट होते.

एकंदरित, डेटा दर्शवितो की ग्राम विकास आराखड्याची अंमलबजावणी अनेक ठिकाणी मर्यादित आहे आणि मुख्य अडचणी म्हणजे निधी, लोक सहभाग, प्रशासनातील विलंब आणि तांत्रिक साधनांची कमतरता. सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने पारदर्शक निधी व्यवस्थापन, कार्यक्षम नियोजन, प्रशिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे, तसेच स्थानिक लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी विविध मार्गांचा सातत्याने वापर करणे आवश्यक आहे. हा समग्र दृष्टिकोन ग्राम विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरतो.

## निष्कर्ष

वाशिम जिल्ह्यातील ग्राम विकास आराखडा गावांमध्ये सकारात्मक परिणाम साधत असून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, आर्थिक विकास आणि सामाजिक सहभाग यामध्ये सुधारणा दिसतेतथापि ., काही सुधारणा अजूनही पूर्णपणे सर्वांपर्यंत पोहोचलेली नाहीत अडचणी प्रमुख प्रभावीपणात अंमलबजावणीच्या . उपलब्धता मर्यादित निधीची म्हणजे, ग्रामस्थांचा मर्यादित सहभाग, प्रशासनातील विलंब आणि तांत्रिक साधनांची कमतरताव्यवस्थापन निधी पारदर्शक करण्यासाठी सुधारणा ., कार्यक्षम नियोजन, प्रशिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर आणि स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे, ज्यामुळे ग्राम विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी साध्य होऊ शकेल.

## संदर्भ ग्रंथ सूची :


1. गुप्ता, के. आर., आणि मैती, पी. (२००८). *भारतामधील ग्रामीण विकास* (खंड ३). अटलांटिक पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्यूटर्स.
2. नरसिंहा, पी. (२००६). *भारतामधील ग्रामीण विकास*. सिरियल्स पब्लिकेशन्स.
3. सिंग, व्ही. (२०१८). *भारतामधील ग्रामीण विकास*. (आवृत्ती). प्रकाशक.
4. सिंग, के. ( २००९). *ग्रामीण विकास: तत्वे, धोरणे आणि व्यवस्थापन* (३री आवृत्ती). संग पब्लिकेशन्स इंडिया प्रा. लि.
5. ठाकूर, डी. (१९८६). *भारतामधील ग्रामीण विकास आणि नियोजन*. डीप अँड डीप पब्लिकेशन्स.
6. लावानिया, व्ही. के. (१९९२). *भारतामधील ग्रामीण विकास*. अशिष पब्लिशिंग हाऊस.
7. थाहा, एम. (१९८९). *एकात्मिक ग्रामीण विकास, भारत*. आशिया आणि पॅसिफिकसाठी एकात्मिक ग्रामीण विकास केंद्र.
8. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था (भारत). (२००५). *भारत ग्रामीण विकास अहवाल: ग्रामीण संस्था*. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था.
9. भट्टाचार्य, एम. (१९९१). *भारताच्या ग्रामीण प्रशासनाचे मार्गदर्शन*. उप्पाल पब्लिशिंग हाऊस.
10. गांधी, एफ. व्ही. (२०१८). *ग्रामीण घोषणापत्र: गावांद्वारे भारताचे भविष्य साकार करणे*. रूपा पब्लिकेशन्स.
11. बेरालिकर, प्र. (२०२२). *ग्रामीण विकास- विद्या प्रकाशन*. (ISBN: 978-9392204197)
12. भाले, के. ( २०१९). *ग्रामविकास मार्गदर्शक पुस्तिका:*. भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे.
13. आघव, द. (2019). *ग्रामीण विकास आणि योजना*. चिन्मय प्रकाशन.

14. कानेतकर, म. (2010). *सहकार आणि ग्रामीण विकास*. मराठी आवृत्ती.

15. *मराठी विश्वकोश*. प्रगत संगणन विकास केंद्र / महाराष्ट्र शासन. (उदाहरणार्थ "ग्राम विकास", "पंचायतराज" यांसारख्या संकल्पना वापरण्यासाठी).